महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका १९८४ मधील परिशिष्ठ ४२ खालील वित्तीय अधिकारामध्ये सुधारणा करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**शासन निर्णय क्र.- विअसु २०१५/प्र.क्र.२१८/इमा २**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २९ ऑक्टोबर, २०२०

वाचा :- १) शासन निर्णय क्र.विअसु २०१५ / प्र.क्र.२१८/ इमारती-२ दि.१६.१२.२०१५.
२) शासन निर्णय क्र. विअसु २०१५/प्र.क्र. २१८/इमा-२ दि. १४/०८/२०१९.
३) शासन निर्णय क्र.विअसु २०१५ / प्र.क्र.२१८ / इमा-२ दि.२७ ऑगस्ट, २०१९

**प्रस्तावना :-**

सार्वजनिक बांधकाम विभाग व पाटबंधारे विभागाकडे सोपविलेली कामे सुलभ रितीने पार पाडण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग नियमावलीच्या परिशिष्ट- ४२ मध्ये परिशिष्ठ - अ मध्ये दि. १५ डिसेंबर २०१५ च्या शासन निर्णयानुसार वित्तीय अधिकारात सुधारणा करण्यात आल्या आहेत. सार्वजनिक बांधकाम नियमावलीच्या परिशिष्ठ - ४२ मधील अ.क्र. १९ नुसार निवडक कंत्राटदारांकडून निविदा मागविण्याचा अधिकारांतर्गत मुख्य अभियंता स्थापत्य व विद्युत व अधीक्षक अभियंता (स्थापत्य व विद्युत ) यांना अनुक्रमे रु. २५ लक्ष व रु. १० लक्ष पर्यंतचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांना आणीबाणीच्या वेळी जसे की पूलाचा भराव वाहून जाणे, पूर परिस्थितीत वाहतूक सुरळीत करण्यासाठी तात्काळ सुरु करुन पूर्ण करावयाची कामे, अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या दौऱ्यासाठी अचानकपणे उद्भवलेली कामे अशावेळीअत्यंत तातडीने कामे हाती घेऊन पूर्ण करावी लागतात. कामांसाठी जॉब क्रमांक देण्याचे अधिकार क्षेत्रीय स्तरावर असल्याने या कामांसाठी आवश्यक जॉब क्रमांक देण्याची कार्यवाही अधीक्षक अभियंता यांनी त्वरीत करावी.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्रमांक :- सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/ इमा- २ दि.२७/०९/२०१८ नुसार रु. ३ लक्ष किंमतीवरील कामांसाठी ई - निविदा पद्धती अनुसरून जाहीर प्रसिद्धी पत्रकांद्वारे निविदा मागवून पुढील कार्यवाही करणे बंधनकारक आहे. उपरोक्त नमूद कार्यपद्धती अवलंबताना क्षेत्रीय स्तरावर अडचणी उद्भवत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. ऑगस्ट २०१९ मध्ये उद्भवलेल्या पूर परिस्थितीमध्ये पूलाचा भरावा वाहून जाणे,रस्ते/ इमारती यांना क्षती पोहोचणे अशा वेळी त्वरेने कामे हाती घेण्यासाठी शासन परिपत्रक क्रमांक विअसु २०१५ / प्र.क्र२१८ / इमा २ दि.१४/०८/२०१९ अन्वये महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका १९८४ मधील परिशिष्ठ ४२ मधील अ.क्र.१९ मध्ये सुधारणा करण्यात आली होती.

सद्य:स्थितीत राज्याच्या अनेक जिल्ह्यात उद्भवलेल्या पूर परिस्थितीमध्ये पूलाचा भरावा वाहून जाणे, रस्ते/इमारती यांनी क्षती पोहोचणे अशा वेळी त्वरेने कामे हाती घेण्यासाठी क्षेत्रीय स्तरावरील मर्यादीत अधिकार विचारात घेऊन रस्ते, पूल व इमारतींना झालेल्या क्षतीची जनजीवन सुरळीत करण्यासाठी तात्काळ दुरुस्ती करणे अत्यावश्यक आहे यास्तव क्षेत्रीय अधिकाऱ्यांना खालील सुधारीत अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका १९८४ मधील परिशिष्ट ४२ मधील अ.क्र.४२ मधील अ.क्र. १९ मध्ये खालील सुधारणा करण्यात येत आहे.

| सा.बां. नियमावली परिशिष्ट ४२ मधील अनुक्रमांक | महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक | अधिकारांचे स्वरुप | ज्याच्याकडे अधिकार सोपविण्यात आला तो अधिकारी | सोपविलेल्या अधिकारीची व्याप्ती | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १९ | | निवडक कंत्राटदारांकडून निविदा मागविण्यासंबंधी कारणे अभिलेखित करून त्यांच्याकडून निविदा मागविण्याचा अधिकार | | | नैसर्गिक आपत्ती तसेच आणीबाणीच्या वेळी जसे की, पूर परिस्थिती , अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या दौऱ्यासाठी रस्ता सुस्थितीत आणून सुरळीत करणे, इमारती दुरुस्ती करणे यासाठी स्तंभ क्र.(३) (४) (५) मधील कार्यपध्दती अनुज्ञेय असेल. |
| | | | मुख्य अभियंता (स्थापत्य/ विद्युत) | रु.५०० लक्ष पर्यंत | **टीप** :- नैसर्गिक आपत्ती / आणीबाणीच्या वेळी किमान तीन दिवसांची निविदा सूचना स्थानिक व राज्य स्तरीय वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध करून ऑफ लाईन पद्धतीने कामे हाती घेण्यात यावीत. |
| | | | अधीक्षक अभियंता (स्थापत्य/ विद्युत) | रु.२५० लक्ष पर्यंत | **टीप** :- नैसर्गिक आपत्ती / आणीबाणीच्या वेळी किमान तीन दिवसांची निविदा सूचना स्थानिक व राज्य |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | स्तरीय वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध करून ऑफ लाईन पद्धतीने कामे हाती घेण्यात यावीत. |
| | | | कार्यकारी अभियंता (स्थापत्य/ विद्युत) | रु.३० लक्ष पर्यंत | **टीप** :- नैसर्गिक आपत्ती / आणीबाणीच्या वेळी ई-निविदा पद्धती ऐवजी निवडक कंत्राटदारांकडून दरपत्रक सिलेक्ट लिस्ट कार्यकारी अभियंता यांनी निविदा मंजूर करुन कामे हाती घेण्यात यावीत. |

१. उपरोक्त नमूद आणीबाणीच्या परिस्थितीतील कामांव्यतिरिक्त अन्य प्रकारच्या दुरुस्तीच्या कामांसाठी निवडक कंत्राटदारांकडून निविदा मागविण्याऐवजी अल्प कालावधीची ०७ दिवस मुदतीची Online निविदा मागवून त्यानुसार पुढील कार्यवाही करावी.

२. वरील सुधारीत अधिकारानुसार करण्यात येणाऱ्या कामांचे दुरुस्तीपूर्वीचे फोटो व दुरुस्तीनंतरचे फोटो कामाच्या देयकासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच अशा कामांची यादीही त्वरीत शासनास सादर करणे बंधनकारक आहे.

३. उपरोक्त सुधारीत अधिकारानुसार कार्यान्वित करण्यात आलेल्या कामांचा दर्जा चांगला राहील याबाबत संबंधीत मुख्य अभियंता यांनी दक्षता व गुणनियंत्रण मंडळ यांच्या समन्वयाने आवश्यक ती कार्यप्रणाली वापरुन व कामांचा दर्जा चांगला राहील याची दक्षता घ्यावी.

४. **उपरोक्त अधिकार हे केवळ अतिवृष्टीमुळे / पुरामुळे खंडीत झालेल्या ठिकाणी त्वरीत वाहतूक सुरळीत करण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या कामांसाठी आणि द्विवार्षिक देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी दि. १३ नोव्हेंबर,२०२० पर्यंत लागू असतील.**

५. **निविदा स्वीकृतीबाबतचे अधिकार सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.विअसु २०१५ / प्र.क्र.२१८ / इमा-२ दि.२७ ऑगस्ट, २०१९ अन्वये लागू राहतील.**

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२०१०२९१३१६४३६०१८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( सचिन चिवटे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव/मा.मुख्य सचिव यांचे सहसचिव
२. मा.मंत्री (सा.बां)/मा.मंत्री (ग्रामविकास व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
३. अ.मु.स (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अ.मु.स (सा.बां)/सचिव (रस्ते)/सचिव (बांधकामे), सा.बां.विभाग, मंत्रालय

५. अ.मु.स., नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
९. महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
१०. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई /निवासी लेखा अधिकारी, मुंबई
११. सर्व मुख्य अभियंते, सा.बां.प्रा.विभाग व (विद्युत) विभाग
१२. सर्व अधीक्षक अभियंते, सा.बां.मंडळ व (विद्युत) मंडळ
१३. सर्व अधिकारी व कार्यासन अधिकारी, सा.बां.विभाग, मंत्रालय
१४. निवडनस्ती (इमारती-२ कार्यासन).